# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

**Innovative Activities आधुनिक भुलाबाई कार्यक्रम दि.५.१०.२०१७**

नाविन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत दि. ०५. १०. २०१७ रोजी आधुनिक भुलाबाई हा कार्यक्रम घेण्यात आली. भुलाबाईच्या गाण्याची पंरपरा आजही चालत असलेली दिसते. म्हणून आजच्या परिस्थीतीला अनुसरुन भुलाबाईच्या गाण्यांचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ. विलास तायडे यांनी लोकगीत व लोककला यावर मार्गदर्शन केले. तर प्रा स्वाती वैद्य यांनी कौटुंबिक नातेसंबंध त्यातील संवाद यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थीनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई, मॉ जिजाऊयांची गुणगौरव पर आधुनिक गाणी सादर केली. कार्यक्रमाच्या शेवटी पौष्टीक खाऊचे वाटप करण्यात आले.








बुधवार, दि. २५ ऑक्टोबर २०१७
epaper.deshonnati.com
देशोन्नती

# भुलाबाईंच्या आधुनिक पध्दतीच्या गाण्यांचा कार्यक्रम

*तालुका प्रतिनिधी/२४ ऑक्टोबर*

**अकोट :** स्थानिक श्री शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य डॉ.ए.एल. कुलट यांच्या मार्गदर्शनाखाली गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने मुलींसाठी आधूनिक पध्दतीने भुलाबाईंच्या गाण्यांचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.विलास तायडे होते तर प्रा.प्रतिभा पवित्रकार, प्रा.डॉ.माणिक ढोरे, ग्रंथपाल प्रा.माधूरी देशमुख, प्रा.मंजु मळसने यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.स्वाती वैद्य यांनी लोककलेच्या माध्यमातून आधूनिक पध्दतीने भुलाबाईंची गाणी शिकविली. वैष्णवी उकळकार, पुजा मामनकार, लक्ष्मी साबळे, धनश्री कुलट, कु.चऱ्हाटे या मुलींनी सावित्रीबाई फुले, माँ जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा गुणगौरव भुलाबाईंच्या गाण्यातून विषद केला. कार्यक्रमाचे संचालन रूपाली नेरकर तर आभार प्रदर्शन अश्विनी दातकर हिने केले.

## श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

## Innovative Activity.

### पेपर बॅग बनवून विविध दुकानांमध्ये त्याचे वाटप.

उद्देश: पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने पॉलिथिन बॅग हानीकारक असून त्याच्या वापरावर बंदी करण्यात आली आहे. म्हणून पर्यावरण पूरक अशा कागदी बॅग बनविण्यात आल्या व त्याचे वितरण करण्यात आले.

दिनांक 20 ऑक्टोबर 2018 रोजी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे बीए भाग दोन च्या विद्यार्थ्यांनी पेपर बॅग बनवून, त्या अकोट मधील विविध दुकानांना वितरित केल्या. पेपर बॅग बनविण्यासाठी वर्तमानपत्राच्या वापर करण्यात आला. या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने प्लास्टिक बॅग हानिकारक असल्याने, पर्यावरणाला पूरक अशा कागदी बॅग तयार करणे, हा उपक्रम घेण्यामागील उद्देश होता. यामुळे समाजात जनजागृती निर्माण करणे, यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, तसेच त्याचे वितरण विविध दुकानात केल्याने या विद्यार्थिनींना भविष्यात रोजगार संबंधी ज्ञान व प्रेरणा मिळावी हा मुख्य उद्देश होता. त्यामुळे विद्यार्थिनींना त्याचे प्रशिक्षण व वितरण याची संधी मिळाली. त्याबद्दल विद्यार्थिनींनी हा उपक्रम आमच्या फायद्याचा आहे. अशा स्वरूपाची प्रतिक्रिया व्यक्त केली. दुकानदारांना आपल्या वस्तूची पॅकिंग करण्याकरिता अशा पेपर बॅग उपयुक्त ठरतात, याचीही कल्पना मिळाली. अशा पेपर बॅग बनविण्यात कु. रोशनी वडतकार, कु. वसु, कु. गुप्ता, कु. निंबुकार, कु. वानखडे, कु. लहाने, कु. शेंडे या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. या पेपर बॅग बनविण्याकरिता गृहअर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. स्वाती वैद्य व प्राध्यापक मंजू मळसणे यांनी मार्गदर्शन केले.






## श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

### गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे विविध मसाले तयार करणे व त्याची विक्री करणे हा उपक्रम.

उद्देश: विद्यार्थिनींना स्वयंरोजगाराची प्रेरणा मिळावी तसेच विक्री कौशल्य व्यवहारज्ञान इत्यादीची माहिती व्हावी.

दिनांक 9 फरवरी 2018 रोजी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे विविध मसाले तयार करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आले. त्यासाठी लागणारे साहित्य याची माहिती देण्यात आली. यावेळी विविध प्रकारचे मसाले तयार करण्यात आले. त्या मसाल्यांचे व्यवस्थित पॅकिंग करून,ते मसाले विविध विभागात विद्यार्थिनी द्वारे विक्री करण्यात आली. त्यात गरम मसाला तसेच चहाचा मसाला तयार करण्याची प्रक्रिया विद्यार्थिनींना प्रा. स्वाती वैद्य, विभाग प्रमुख, गृहअर्थशास्त्र विभाग यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थिनींना स्वयंरोजगाराची प्रेरणा मिळाली. तसेच तयार झालेला माल. कसा विकायचा यासंबंधी विक्री कौशल्य, तसेच व्यवहारज्ञान इत्यादीची माहिती गृहअर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींना झाली. या नाविन्यपूर्ण उपक्रमात बीए भाग दोन च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एल. कुलट यांनी प्रशंसा केली. विद्यार्थिनिही या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आम्हाला असे विविध उपक्रम शिकवल्या जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.









# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे स्नॅक रेसीपी प्रत्यक्षिक कार्यशाळा

उद्देश: विध्यार्थीनी मध्ये पाककला कौशल्य विकसीत करणे.

दि. 20.01.2015 रोजी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे स्नॅक रेसीपी प्रत्यक्षिक कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत कांचन बधीले यांनी विविध स्नॅक रेसीपीचे प्रत्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. त्यात कचोरी, साबारवडी, समोसे,इ. पदार्थ करून दाखविले. ही कार्यशाळा विभाग प्रमुख प्रा. स्वाती वैद्य यांनी आयोजीत केली. गृहअर्थशास्त्राच्या २० विध्यार्थीनी या उपक्रमात सहभागी झाल्या.



कांचन बधीले यांनी विविध स्नॅक रेसीपीचे प्रत्यक्षिक करून दाखवतांना

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

## विद्यार्थीनींना बॅग बनवीने व हस्तकला शिकवीने

Workshop on Making Paper Bags 2.01.2018

गृहअर्थशास्त्र विभागाने विदयार्थीनीं करीता पर्यावरण पुरक अशा पेपर बॅग बनविण्याची कार्यशाळा आयोजीत करण्यात आली.

उददेश :— विद्यार्थीनी मध्ये कला कुशलता निर्माण व्हावी. व त्याचा उपयोग त्यांना स्वयंरोजगार म्हणून करता यावा तसेच पर्यावरणास पुरक अशी जागरूकता निर्माण व्हावी या उददेशाने ही कार्यशाळा घेण्यात आली. तसेच पेपर बॅग बनविण्याच्या कलाकौशल्यची माहीती होण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा घेतली.

प्रा. स्वाती वैद्य व डॉ. प्रशांत कोठे यांनी या कार्यशाळेला पॉलिथीन बॅगचे तोटे व घातक परिणामाची माहीती सांगून मार्गदर्शन केले. विविध बॅग बनविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. या कार्यशाळेत ४० विदयार्थीनींनी सहभाग घेतला. कार्यशाळेमुळे सहभागी विदयार्थीनींना वर्तमानपत्र तसेच निमंत्रण पत्रिका या पासून हया बॅग तयार करण्या बाबत माहीती मिळाली. प्रात्याक्षिक विदयार्थीनींना करून पाहता आले.



Workshop on Making Paper Bags 2.01.2018

# पर्यावरण पुरक अशा पेपर बॅग बनविण्याची  कार्यशाळाचे आयोजन













बनविलेल्या पेपर बॅग